# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0541 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/11/2019 23:32 बजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 08/11/2019

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/11/2019

**Time From (वेळेपासून):** 17:19 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/11/2019 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 049 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/11/2019 23:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा खनिकर्म कार्यालय, गडचिरोली,गडचिरोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किशोर सुधाकर बावणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | नवेगांव, पोस्ट मुडझा,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | नवेगांव, पोस्ट मुडझा,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9404126310

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीकांत रमेश शेळके | | | 1. जिल्हा खनिकर्म अधिकारी,जिल्हा, गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 11/11/2019नांव:- श्री किशोर सुधाकर बावणे, वय 30 वर्षे, जात-ढिवर (एनटी-बि.), धंदा-ठेकेदारी, रा. नवेगांव, पोस्ट मुडझा, ता., जि. गडचिरोली. मो.नं. 9404126310. मी दिनांक 08/11/2019 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मी मौजा नवेगांव येथील राहणारा असुन मी के.बी. कन्ट्रक्षन नावाने उघडुन शासकिय व इतर बांधकामाचे ठेकेदारीचे काम करतो तसेच बिल्डींग मटेरियल सप्लायरचे काम करतो. त्याबाबत मी शासकिय परवाना सुध्दा काढलेला आहे. सन 2018-19 मध्ये मौजा कारवाफा (जांभळी घाट) नदीतील रेती घाट लिलाव मध्ये 4 लाख 88 हजार रुपयामध्ये खरेदी केले त्याबाबत माझ्या नावे जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथुन एकुण 353 ब्रास गौण खनिज विक्रेता परवाना क्रं. कार्या2/अ.का. खनिज/कावि/815/2019, दि. 16 ऑगस्ट 2019 अन्वये मला प्राप्त झाला त्याप्रमाणे मी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन रेतीघाटाचा दिनांक 27/08/2019 रोजी ताबा घेवुन नदी मधुन रेतीचा उपसा करुन श्री भगवानसाय दौलतशहा मडावी रा. जांभळी यांचे जागेत साठा करण्यात आला परंतु त्याची मुदत दिनांक 30/09/2019 पावेतो होती. त्यानंतर दिनांक 27/09/2019 रोजी मी जांभळी येथुन रेती हे खनिज साठवणुक करुन विक्री करण्याकरीता गौण खनिज विक्रेता लायसन्स मिळण्यासाठी जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे अर्ज सादर केला. त्याबाबत मला मा. जिल्हाधिकारी कार्यालय खनिकर्म विभाग, गडचिरोली यांचे कडुन गौण खनिज विक्रेता लायसन्स क्रं. कार्या-2/अ.का.खनिज/कावि/1070/2019, दिनांक 31/10/2019 अन्वये प्राप्त झाला. त्यासंबंधीचे रेती हे गौण खनिज वाहतुक परवाना बुक घेण्याकरीता दिनांक 08/11/2019 रोजी मी जिल्हाधिकारी कार्यालय, खनिकर्म विभाग, गडचिरोली येथे जावुन श्री श्रीकांत शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना भेटुन वाहतुक परवाना बुकाची मागणी केली असता तुझे पर्यावरण शुल्क भरलेले नाही, तुला स्वाक्षरी करुन परवाना बुक पाहीजे असल्यास त्याचे एकुण 120,000/- रुपये माझे कडे दे. त्यानंतरच मी तुला परवाना बुक देईन तेव्हा मी साहेब माझ्या गाडया बंद आहेत व इतके पैसे माझ्याकडे नाहीत, जास्त होतात, काहीतरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी काही कमी होत नाही, 120000/- रुपये दयावेच लागेल, ते घेवुन ये नंतर परवाना बुक घेवुन जा असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ठिक आहे साहेब आता माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणालो तेव्हा ठिक आहे नंतर पैसे घेवुन ये असे म्हणुन त्यांनी मला पैशाची मागणी केली. श्री श्रीकांत शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी मला रेती या गौण खनिजाच्या वाहतुक परवान्यावर स्वाक्षरी करुन वाहतुक परवाना बुक देण्याचे कामाकरिता रू. 1,20,000/- लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री श्रीकांत षेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना रु. 1,20,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. 1,20,000/- सोबत

घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. श्री श्रीकांत शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचेषी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 1,20,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.त्यानंतर श्री सुरेंद्र गरड, पोलीस उपअधिक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री सुरेंद्र गरड साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हईस रेकर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 1,20000/- (रू. 500/- दराच्या 140 चलनी नोटा व रू. 2000/- दराच्या 25 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचे सह जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालय गडचिरोली येथे जाण्यास रवाना केले. मी जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालय गडचिरोली येथे श्री श्रीकांत शेळके साहेबांना भेटण्यास गेलो असता, त्यांनी मला रेती या गौण खनिजाच्या वाहतुक परवान्यावर स्वाक्षरी करुन वाहतुक परवाना बुक देण्याचे कामाकरिता रू. 1,20000/- लाच रकमेची स्पश्ट मागणी करून थोडयाच वेळात लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला. त्यादरम्यान श्री श्रीकांत शेळके यांनी माझे मोबाईल वर संपर्क केला असल्याने त्यांनी कशासाठी फोन केला व ते कार्यालयात आहेत काय? याबाबत माहिती घेण्याकरीता दोन्ही पंचासमक्ष माझे मोबाईल फोनवरुन श्री श्रीकांत शेळके साहेब यांचे मोबाईल फोनवर संपर्क साधुन व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन माझे मोबाईल क्रं. 9404126310 वरून श्री श्रीकांत शेडके यांचे मोबाईल क्रं. 9422114252 यावर संपर्क केला असता श्री श्रीकांत शेळके यांनी मला 1,20,000/- रुपये घेवुन सोमवारला ये, मी आता गावाकडे जात आहे. असे सांगीतले. त्यानंतर पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर सोमवार ला सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत. आज दि. 11/11/2019 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील तपासी अधिकारी श्री सुरेंद्र गरड, शासकिय पंच, स्टाफ व मी शासकिय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोलीचे अलीकडील मोकळ्या जागी पोहचुन आडोसा घेवून थांबलो. त्यावेळी मला पंचासमक्ष अथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील दुप्पटयाने चेहरा पुसावा असा इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यायास रंगे हाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हाईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे श्री श्रीकांत शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 श्री शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे कार्यालयात गेलो असता, त्याठिकाणी श्री शेळके साहेब हजर होते. त्यावेळी मी अथ्रसिन पावडर लावलेल्या रू. 1,20,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिष्यातुन काढुन श्री शेळके साहेब यांना दिल्या असता त्यांनी लाच रक्कम रू. 1,20,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून त्यांचे कक्षेतील टेबलचे ड्रापमध्ये ठेवली. त्यावेळी मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील दुप्पटयाने चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री श्रीकांत रमेष शेळके, वय 31 वर्षे, धंदा- नौकरी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली, ता. जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला रेती या गौण खनिजाच्या वाहतुक परवान्यावर स्वाक्षरी करुन वाहतुक परवाना बुक देण्याचे कामाकरिता रुपये 1,20,000/- (एक लाख वीस हजार रूपये) लाच रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ( सुरेंद्र गरड ) पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, गडचिरोली.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): DNYANESHWAR DATTATRAYA UDAR
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): PCMH94069 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Bawane.

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

पोलीस स्टेशन गडचिरोली

**Name** (नाव): pradip vashantrao chaugaonk

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): dgppvcm6801

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)